सकाळ २४.५.१९.

# ऑफिसला पोहचणार तरी कसे?

वसई, ता. २३ (बातमीदार) : नालासोपारा परिसरात मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत आहे. मात्र त्यामानाने अनेक पायाभूत सोयी-सुविधांचा अभाव दिसून येत आहे. तसेच वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. अशात रेल्वेस्थानकाच्या पूर्वेकडील भागात वाहतूक कोंडी नित्याची डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळे सकाळी गर्दीच्या वेळेत कार्यालयात जाणारे नोकरदार वर्ग या वाहतूक कोंडीने हैराण झाला आहे. त्यामुळे आम्ही ऑफिस गाठायचे तरी कसे, असा सवाल या प्रवाशांमुळे होत असून यावर लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## प्रवासी हैराण; नालासोपारा कोंडीच्या गर्तेत

नालासोपारा परिसरातून रेल्वेस्थानकाकडे जाणारा मार्ग पूर्णतः वाहनामुळे जाम असतो. त्यामुळे प्रवाशांना चालणेही मुश्कील होते. अशातच नियमांना बगल देत चुकीच्या दिशेने वाहने चालवली जात आहेत. यामुळे वाहनांच्या रांगा रस्त्यावर सकाळी व संध्याकाळी दिसून येतात. शहरातील लाखो नागरिक हे रेल्वेने प्रवास करतात. यासाठी त्यांना नालासोपारा स्थानकात यावे लागते; परंतु घरातून बाहेर पडल्यावर कार्यालय गाठण्यासाठी या कोंडीतून मार्ग काढण्याची स्पर्धा लागते. मुख्य मार्गावरून विद्यार्थी शाळेत ये-जा करण्यासाठी रस्ता ओलांडत असतात. मात्र भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका निर्माण होतो. पालक जर सोबत नसले तर त्यांना रस्ता ओलांडणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच शहरात सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असली तरी ती बऱ्याचदा बंद असते.

महापालिकेने रस्ते रुंदीकरण केले असले तरी बेवारस वाहने, तसेच काही कामानिमित्त येणारे नागरिक रस्त्याच्या कडेला वाहने उभी करतात. त्यामुळे कोंडीत भर पडते. याला वाहनतळाचा अभाव कारणीभूत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. वसई-विरार महापालिका, उपप्रादेशिक परिवहन विभाग व वाहतूक विभागाने वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी एकत्र येत संयुक्तरित्या योजना आखून त्याची कार्यवाही केल्यास कोंडी फुटेल व नागरिकांना प्रवास करण्यासाठी होणारी दमछाक दूर होऊन मोकळा श्वास घेता येईल, असे नागरिकांतून सांगण्यात आले.



वसई : वाहन चालकांकडून वाहतूक नियमांचे पालन होत नसल्याने कोंडी होते.

### कोणत्या मार्गावर कोंडी?

नालासोपारा पूर्वेकडील आचोळे मार्ग, तुळिंज, सेंट्रल पार्क, जुना जकात नाका मार्ग, मजेठिया नगर, नगीनदास पाडा, धानीव रोड, एव्हरशाईन नगर, उड्डाणपूल परिसर, पंचमुखी हनुमान मंदिर मार्ग, सोपारा गाव, समेळ पाडा मार्ग, स्टेशन परिसर.

### 'पर्यायी उड्डाणपूल उभारा'

प्रचंड प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी पाहता उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली; परंतु या कोंडीला रोखण्यात अपयश आले आहे. त्यामुळे नव्याने पर्यायी उड्डाणपूल तयार करण्याचा प्रस्ताव महापालिकेचा आहे; परंतु केवळ घोषणा झाली असून अंमलबजावणी केव्हा, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

बेकायदा वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई केली जाते. तसेच अनेक वाहने जप्त केली आहेत. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक विभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत.

- दशरथ वाघुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

नालासोपारा पूर्वेला प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे महामार्गावर जाण्यासाठी अधिक उशीर होतो. तसेच रस्ते अरुंद आहेत. पर्यायी मार्गाची व्यवस्था झाली तर प्रवास करताना सोईचे होईल महापालिकेने याबाबत लक्ष द्यावे.

- प्रफुल मोरे, प्रवासी

कामावर जाताना व घरी परतताना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते, रोजच ही समस्या आहे. वाहतूक विभाग व वसई-विरार महापालिकेने यावर तोडगा काढावा. तसेच या वाहतूक कोंडीचा अत्यावश्यक सेवेतील वाहनांना देखील फटका बसतो.

- प्रताप पुजारी, नागरिक

CS CamScanner

पुढारी ५.५१.२.

# मेट्रो कारशेड सुनावणी भाईंदरमध्येच होणार

## ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान सुनावणीचे आयोजन

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

एमएमआरडीएने भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील ग्रामस्थांच्या जागेत मेट्रो कारशेड प्रस्तावित केली असून त्याविरोधात ग्रामस्थांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे ११७६ हरकती दाखल केल्या आहेत. त्यावरील सुनावणी येत्या ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान भाईंदर येथील पालिका मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यात आली असून तसे पत्रच कोकण विभागाच्या नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाने पालिकेला सोमवारी पाठविले आहे.

तत्पूर्वी हि सुनावणी कोकण भवन मध्ये आयोजित करण्यात आली होती. या ठिकाणी तब्बल ११७६ जणांना उपस्थित राहणे गैरसोयीचे ठरणार असल्याने हि सुनावणी कोकण भवनऐवजी मिरा-भाईंदर शहरातच आयोजित करावी, यासाठी ग्रामस्थांनी आ. प्रताप सरनाईक यांच्या माध्यमातून कोकण विभागाचे नगर रचना सहसंचालक जितेंद्र भोपळे यांना विनंती केली होती. मात्र प्रस्तावित कारशेड मुर्धा, राई व मोर्वा गावांऐवजी उत्तन येथील शासकीय जमिनीवर उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एमएमआरडीएला अलिकडेच नागपूर येथे पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनावेळी आयोजित बैठकीत दिले.

त्या अनुषंगाने एमएमआरडीएने अद्याप कोणतीही कार्यवाही न केल्याने मुख्यमंत्र्यांच्या निर्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यातच जुन्याच अधिसूचनेचा अंमल करून सुनावणी घेण्यात येणार असल्याने कारशेड स्थलांतराच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित झाला आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार एमएमआरडीएने भाईंदर येथील मुर्धा, राई व मोर्वा गावातील ३२ हेक्टर जागेत मेट्रो प्रकल्प क्रमांक ७ व ९ करीता मेट्रो कारशेड प्रस्तावित केली आहे. त्यानुषंगाने कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाने कारशेडसाठी जागेच्या भूसंपादनाची अधिसूचना ९ सप्टेंबर २०२२ रोजी जारी केली.

त्याला गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित अधिसूचनेविरोधात ११७६ हरकती दाखल केल्या. तसेच पालिकेच्या प्रारुप विकास आराखड्यात याच गावांमधील जमिनीवर मेट्रो कारशेडचे आरक्षण टाकले आहे. त्यामुळे ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित कारशेड उत्तन मधील शासकीय जागेत स्थलांतर होणार कि, जुन्याच अधिसूचनेनुसार याच गावांत कारशेड बांधणार, याची सुस्पष्टता अद्याप झालेली नाही. मात्र ९ सप्टेंबर २०२२ रोजी जारी झालेल्या अधिसूचनेवर दाखल झालेल्या हरकतींवर येत्या ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान होणारी सुनावणी कारशेडच्या निश्चितीवर संशयाचे वलय निर्माण करणारी असून ग्रामस्थ देखील संभ्रमात पडले आहेत.

तर आयोजित केलेली सुनावणी केवळ सोपस्कार असल्याचा सूर कारशेडला विरोध असलेल्या काही ग्रामस्थांनी आळवला असला तरी या कारशेडचे स्थलांतर उत्तन मधील शासकीय जागेतच होणार असल्याची बाब देखील ग्रामस्थांना अंधारात ठेवणारी असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. या होणाऱ्या आगामी सुनावणीकडे परिसरातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

---

लोकमत ५-५१-२.

# शवदाहिनीच्या सिलिंडरचा चायनीज हॉटेलमध्ये वापर

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा - भाईंदर महापालिकेच्या भाईंदर पश्चिमेतील स्मशानभूमीतील शवदाहिनीचे गॅस सिलिंडर चक्क चायनीज हॉटेल आणि घरात वापरून अपहार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. याप्रकरणी स्मशानभूमीतील कंत्राटी कर्मचाऱ्यासह त्याचा मुलगा आणि अन्य एकावर भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिकेच्या भाईंदर स्मशानभूमीत एलपीजी गॅसवरील शवदाहिनी आहे. त्यासाठी एलपीजी गॅस सिलिंडर हे नवकार गॅस एजन्सीकडून पालिका खरेदी करते. शवदाहिनीचे कामकाज पाहणाऱ्या शेखर इलेक्ट्रिक कंपनीचा कर्मचारी बबन खुळे याच्या ताब्यात गॅस सिलिंडर दिले जातात. मात्र, मध्यंतरी गॅस सिलिंडर पुरेसे नसल्यामुळे मृतदेह जळत नसल्याच्या तक्रारी आल्या होत्या. मात्र, गॅस वापराच्या देयकात वाढ दिसल्यामुळे शहर अभियंता दीपक खांबित यांनी चौकशी करण्याचे आदेश कनिष्ठ अभियंता प्रशांत जानकर यांना दिले. जानकर यांनी चौकशी केली असता खुळे व त्याचा मुलगा राहुल आणि मिराज अली हे स्मशानभूमीतील दोन गॅस सिलिंडर रिक्षातून घेऊन जाताना सापडले. याप्रकरणी आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानंतर पालिकेच्या वतीने जानकर यांच्या फिर्यादीवरून भाईंदर पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. खुळेचा मुलगा राहुल याने पटाडिया कॉम्प्लेक्समध्ये चायनीज हॉटेल सुरू केले आहे. तेथे पालिकेच्या शवदाहिनीचे गॅस सिलिंडर वापरले जायचे. तसेच घरीही वापर होत होता, अशी माहिती सूत्रांनी दिली.

## 'घोटाळ्याची सखोल चौकशी करा'

स्मशानभूमीतील हा सिलिंडर घोटाळा काही वर्षांपासून सुरू असल्याची शक्यता आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी तसेच शवदाहिनीसाठी वापरात आलेल्या गॅस सिलिंडर व पुरवठा याचे ऑडिट करण्याची मागणी काँग्रेस प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी केली आहे.

CamScanner

लोकसत्ता ५-४-१

# मीरा-भाईंदर शहर सुरक्षेसाठी पालिकेचा पुढाकार

## सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत वाढ करण्याचा निर्णय

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर** : मीरा- भाईंदर शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत वाढ करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. यामुळे शहरातील गुन्हेगारी घटनांवर लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे.

महापालिका हद्दीत नागरिकांच्या सुरक्षेसाठी पालिकेकडून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्यात येत आहे. यासाठी २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत साधारण साडेसहाशे कॅमेऱ्याची उभारणी करण्यात आली आहे. यासाठी साडेसहा कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. परंतु तरीदेखील अनेक भागात कॅमेऱ्याची कमतरता आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख चौकात सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्याचे आदेश पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी नुकत्याच घेतलेल्या बैठकीत दिले आहेत. त्यानुसार शिल्लक राहिलेल्या साडेतीन कोटी रुपयांचा वापर करून सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कॅमेऱ्यामुळे शहर सुरक्षेत मोठी भर पडणार आहे, अशी प्रतिक्रिया उपायुक्त संजय शिंदे यांनी दिली आहे.

**१७४ कोटींचा प्रकल्प अहवाल मंजुरीनंतरही अडचणी**

शहर हे पूर्णतः सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या अधिपत्याखाली ठेवण्यासाठी गृह विभागाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे एका सल्लगाराची नेमणूक करून गृह विभाग, पालिका आणि पोलीस अशा तिन्ही यंत्रणेने एकत्र येऊन सर्वेक्षण केले आहे. शहरात कॅमेरे उभारण्यासाठी १७४ कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे, परंतु या अहवालास शासनाने मंजुरी दिल्यानंतर देखील काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे काम रखडले असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

पुढारी पा.नं.५.

# काशिमिरा येथे २० लाखांचे मॅफेड्रोन अमली पदार्थ जप्त

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

काशिमिरा पोलीस ठाणे हद्दीत जवळपास २० लाखांचे मॅफेड्रोन हे अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन आलेल्या इसमाला अटक करून अमली पदार्थ विक्री कक्षाने अटक केली आहे.

अमली पदार्थ विक्री कक्षाला काशिमिरा येथील सगनाय देवी मंदिराच्या डाव्या बाजूच्या रस्त्यावर एक इसम अमली अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने त्या ठिकाणी सापळा रचून २२ जानेवारी रोजी पहाटे सव्वा तीनच्या सुमारास एका इसमाला ताब्यात घेतले. त्यावेळी त्याची चौकशी केली असता फहिम करिम खान ( ५४ ) असे त्याने नाव सांगितले.

यावेळी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ९८ ग्रॅम वजनाचे १९ लाख ६० हजार रुपये किमतीचे मॅफेड्रोन हे अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन आल्याचे आढळून आले. त्याच्या विरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ ( क) , २२ (क ) प्रमाणे काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CS CamScanner

लोकसत्ता ५.५.१९.

# जागेअभावी प्रकल्प रखडले

## वसई, विरारमधील कचऱ्याची समस्या कायम

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई, विरार शहरातील कचऱ्याची समस्या सुटावी यासाठी पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे विविध प्रकल्प नियोजित करण्यात आले आहेत. परंतु जागा मिळत नसल्याने तूर्तास या प्रकल्पांची रखडपट्टी झाली आहे.

शहरात दिवसाला सुमारे ७०० ते ८०० टन इतका कचरा निघत आहे. त्यामुळे भोयदापाडा येथे असलेली कचराभूमी आता अपुरी पडत आहे. त्यामुळे आणखीन नवीन कचराभूमी तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे. दैनंदिन निघणाऱ्या कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होणे आवश्यक असल्याने पालिकेने कचऱ्याचे वर्गीकरण, बायोगॅस, कचरा प्रक्रिया प्रकल्प, सीएनडी वेस्ट प्रकल्प असे नियोजन करण्यात आले आहे. कचरा प्रकल्प उभारण्यासाठी पालिकेने पाचूबंदर येथे जागाही बघितली होती. या जागेत प्रकल्प उभारून दिवसाला अंदाजे ३० टन इतक्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार होती.

दुसरीकडे रस्त्याच्या कडेला तोडलेल्या बांधकामाचा राडारोडा आणून टाकला जात आहे. यामुळे शहराच्या विद्रूपीकरणात भर पडत होती. यावर उपाययोजना म्हणून दीडशे मेट्रिक टन इतक्या क्षमतेचा सीएनडी वेस्ट प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यासाठी शासनाकडून ७ कोटी रुपये इतका निधी मिळणार आहे, परंतु जागा मिळत नसल्याने प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. ज्या काही जागा पाहिल्या जात आहेत. त्यामध्ये किनारा नियंत्रण क्षेत्र (सीआरझेड), पाणथळ जागा (वेटलँड) अशा विविध अडचणी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात येतात. प्रकल्पांची कामे मार्गी लागावी यासाठी जागेचाही शोध सुरूच असून त्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे पालिकेकडून सांगण्यात येत आहे.



### जुनी कचराभूमी स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न

भोयदापाडा येथील कचराभूमीवरील कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावून जागा मोकळी करण्यात येणार आहे. सुरुवातीला कचराभूमीवर असलेला जुना कचरा आहे त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. पालिकेला स्वच्छ भारत अंतर्गत ४६ कोटींचा निधी मिळाला आहे. कचराभूमीवर कचरा प्रक्रिया प्रकल्प लावून त्या ठिकाणी असलेल्या कचऱ्याचे बायोमाइनिंग करून येत्या दोन वर्षात या कचाराभूमीवरील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

> “ शहरातील विविध प्रकारच्या कचऱ्याचे व्यवस्थापन व्हावे यासाठी पालिकेचे प्रयत्न सुरूच आहेत. जागा मिळत नसल्याने काही प्रकल्प राबविता आले नाहीत. जागेचा शोध सुरूच आहे. जागा मिळाली तर हे प्रकल्प पूर्ण होऊ शकतील.
>
> -डॉ. चारुशीला पंडित, उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग महापालिका

लोकसत्ता पु.पा.१.

# मेट्रोच्या विलंबामुळे वसईकर नाराज

## कंपनीची नियुक्ती परंतु अहवाल तयार नाही

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मुंबईत मेट्रोच्या विविध मार्गाचे उद्घाटन होत असताना वसईत मात्र मेट्रोचे काम सुरू होत नसल्याबद्दल वसईकरांनी नाराजी व्यक्त केली आहे. २०१८ मध्ये वसईत मेट्रो सुरू करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र अद्यापही त्याचा सविस्तर अहवाल नाही. किमान अहवाल तयार करून पुढील कामाला सुरुवात करा अशी मागणी करण्यात येत आहे.

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) इतर शहरात मेट्रोचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. दहिसर ते डीएन नगर मेट्रो २ (अ) आणि दहिसर ते अंधेरी मेट्रो- ७ या मार्गावरील एक टप्पा सुरू झाला असून दुसरा टप्पा नुकताच सुरू झाला आहे. शहरासाठी पालिकेने घोडबंदर पुलापासून वसई शहरात मेट्रो आणण्यासाठी मेट्रो १३ हा मार्ग प्रस्तावित केला होता. एमएमआरडीएने या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी ऑगस्ट २०१८ मध्ये दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (डीएमआरसी) ची नियुक्ती केली होती. वसईतील मेट्रोची लांबी २४ किलोमीटर एवढी होती. मात्र सल्लागार नेमण्याच्या पलीकडे काम नाही. ४ वर्षे उलटूनही अहवाल तयार नाही, असा आरोप आम आदमी पक्षाचे जॉय फरगोस यांनी केला आहे. एमएमआरडीएच्या सर्वंकष अहवालानुसार मेट्रोला २०३१ नंतर सुरू होणार आहे. मात्र अहवाल तयार नसल्याने हे काम आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता फरगोस यांनी व्यक्त केली आहे. मेट्रो मार्ग १०, ११ आणि १२ चे काम पूर्ण झाल्यानंतर वसई मेट्रो मार्ग १३ चे काम हाती घेतले जाणार आहे.

सल्लागार समितीने अहवाल तयार करून प्रक्रिया सुरू करावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे खासदार राजेंद्र गावित यांनी सांगितले. याबाबत मेट्रोचे आयुक्त श्रीनिवासन यांच्याशी संपर्क साधला असता सध्या वसई मेट्रोची सद्यःस्थिती काय आहे त्याची माहिती घेऊन कळवले जाईल, असे सांगितले.

# तीन महिन्यांचे वेतन थकल्याने डॉक्टर आणि परिचारिकांचे आंदोलन

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** करोनाकाळात वैद्यकीय सेवा देण्यासाठी पालिकेच्या सेवेत आलेल्या कंत्राटी डॉक्टर्स आणि परिचारिकांना मागील तीन महिन्यांपासून वेतनच मिळालेले नाही. त्यामुळे सोमवारी त्यांनी आयुक्तांच्या दालनाबाहेर आंदोलन केले. या आंदोलनानंतर पालिकेने तात्काळ वेतन देण्याचे मान्य केले.

२०२१ मध्ये करोनची तीव्र लाट पसरली होती. पालिकेने आरोग्य केंद्रांबरोबर दोन रुग्णालये उघडली होती. त्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. त्यामुळे पालिकेने थेट आरोग्य सेवेत भरती प्रक्रिया सुरू केली होती. वैयक्तिक कंत्राटी पध्दतीने डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. श्रेणीनुसार वेतन देण्यात येत होते मात्र ऑक्टोबर २०२२ पासून त्यांना वेतनच देण्यात आले नव्हते. यामुळे हे डॉक्टर्स आणि कर्मचारी हवालदिल झाले होते.

ज्या काळात सर्वत्र टाळेबंदी होती त्यावेळी आम्ही आमचे जीव धोक्यात घालून नागरिकांना आरोग्यसेवा दिली. पालिकेने आम्हाला चांगल्या वेतनाचे तसेच कायम करण्याचे आश्वासन दिले. मात्र मागील तीन महिन्यांपासून वेतनच देण्यात आले नसल्याचे या आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

याबाबत माहिती देताना पालिकेचे उपायुक्त डॉ विजयकुमार द्वासे यांनी सांगितले की, या वैद्यकीय विभागातील वेतनाची बाब आस्थापनाकडे प्रलंबित होती. पालिकेचा आकृतीबंध २०१४ रोजी मंजूर होता. नंतर विविध कारणांमुळे तो मंजूर झाला नसल्याने या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत धोरण नव्हते. त्यामुळे ही समस्या उद्भवली होती. परंतु आता या त्रुटी दूर झाल्या असून त्यांना थकीत वेतन देण्यात येत आहे. हे सर्व वैयक्तिक कंत्राटी कर्मचारी असल्याने त्यांना कायम करण्यात येणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आयुक्तांच्या दालनाबाहेर एकाच आठवड्यात झालेले हे दुसरे आंदोलन आहे.

लोकसत्ता पु-५१-१८

# पोलीस आयुक्तालयातील पाच अधिकाऱ्यांचा गौरव

## दहा कोटींचे रक्तचंदन जप्त, २८ वर्षांनी हत्येचा छडा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** क्लिष्ट हत्या, जबरी चोरी आदी विविध गुन्ह्यांची उकल करून कुख्यात टोळ्या जेरबंद करणाऱ्या पाच पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते डिसेंबर महिन्यातील 'उत्कृष्ट उकल'चा (बेस्ट डिटेक्शन) पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात काशिमीरा, वालीव ठाणे तसेच गुन्हे शाखा १, २ आणि ३ च्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

दर महिन्याला उत्कृष्ट तपास करून गुन्ह्यांची उकल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्तांच्या हस्ते 'उत्कृष्ट उकल'चा पुरस्कार देण्यात येतो. नायगावमधील स्टार सिटी येथे २० डिसेंबरला सुनील तिवारी या मूकबधिर व्यक्तीची हत्या झाली होती. गुन्हे शाखा २ आणि मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने तांत्रिक विश्लेषण करून पुरावा नसताना आरोपी यशवर्धन झा याला अटक केली. चोरीच्या उद्देशाने ही हत्या झाली होती. याप्रकरणी गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे तसेच मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख यांना उत्कृष्ट तपासासाठी गौरविण्यात आले.

त्याचबरोबर १९९४ मध्ये पेणकरपाडा येथील राजनारायण प्रजापती यांच्या पत्नी आणि तीन मुलांची हत्या करण्यात आली होती. गुन्हे शाखा १ च्या पथकाने २८ वर्षांपूर्वी झालेल्या हत्येचा छडा लावला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी काल्या ऊर्फ राजकुमार हा परदेशात पळून गेला होता. त्याचा माग काढून मुंबई विमानतळावरून त्याला अटक करण्यात आली. याप्रकरणी गुन्हे शाखा १ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरवण्यात आले.

वालीव पोलिसांनी महामार्गावरून रक्तचंदनाची चोरटी तस्करी उघडकीस आणली. पोलिसांनी कारवाई करून एक ट्रक अडवला आणि नऊ कोटी ६१ लाख रुपयांचे रक्तचंदन जप्त केले. आजवरची ही सर्वात मोठी कारवाई होती. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांना गुन्ह्याची 'उत्कृष्ट उकल' केल्याप्रकरणी गौरविण्यात आले.

### मोबाइल चोरणारी टोळी जेरबंद

■ काशिमीरा पोलिसांनी मोबाइल चोरी करणाऱ्या एका टोळीला अटक करण्यात यश मिळवले होते. ही टोळी विविध प्रकारे नागरिकांचे मोबाइल लंपास करत होती. या गुन्ह्यांचा छडा लावून आरोपींकडून १७ गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली. काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांना या कार्याबद्दल गौरविण्यात आले.

■ शहरात गाड्यांच्या काचा तोडून महागड्या 'म्युझिक सिस्टीम' चोरणारी टोळी सक्रिय झाली होती. गुन्हे शाखा ३ च्या पथकाने या टोळीचा छडा लावला आणि तिघांना अटक केली. या टोळीकडून चोरलेले २० कार टेप आणि एकूण १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखा ३ चे प्रमुख प्रमोद बडाख यांना याप्रकरणी उत्कृष्ट उकल केल्याबद्दल गौरविण्यात आले.

पुण्यनगरी ५.१.१.

लोकमत ५.१.१.

# काँग्रेसची विचारधाराच देशाला अखंड ठेवेल – भावना जैन



मीरा रोड : प्रजासत्ताक दिनापासून देशपातळीवर काँग्रेस हात से हात जोडो अभियान सुरू करणार आहे. यानिमित्त मीरा रोड येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व मीरा-भाईंदर प्रभारी भावना जैन या आल्या होत्या. यावेळी स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना गेल्या ६० वर्षांत सर्वांगीण विकासाबरोबरच देशाला अखंड ठेवण्याचे काम काँग्रेसने केले असून महात्मा गांधींची सर्वधर्मसमभावाची विचारधाराच सर्वश्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन भावना जैन यांनी केले. सध्या वेगळ्या विचारधारेचे लोक सत्तेवर आल्याने त्यांनी लोकशाहीची व्याख्या बदलली आहे. आपल्याला अभ्यासू नेतृत्व लाभले असून माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात काँग्रेस मजबूत आहे. त्या पुढे म्हणाल्या की, भाजप म्हणजे भ्रष्ट जुमला पार्टी असून चुकीच्या धोरणांमुळे उद्योगधंदे बंद होत असल्याने देशात बेरोजगारी, महागाई वाढली आहे. उद्योगपतींच्या इशाऱ्यावर देश चालत असून गोरगरीब जनता नाहक भरडली जात असल्याची टीका जैन यांनी केली. माजी उपमहापौर सय्यद नूरजहाँ हुसैन, जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, माजी नगरसेवक जुबेर इनामदार, अनिल सावंत, राजीव मेहरा, अश्रफ शेख, मर्लिन डिसा, गीता परदेशी, रुबिना शेख, फरीद कुरेशी, प्रवक्ते प्रकाश नागणे, दिनेश सक्सेना, ब्लॉक अध्यक्ष फारुख हुसैन शेख, महिला अध्यक्ष रूपा पिंटो, युवक अध्यक्ष सिद्धेश राणे, कुणाल काटकर, सोशल मीडियाच्या यास्मिन खान, रोहित रोहिला यांच्यासह विविध सेल, ब्लॉक, फ्रँटल अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## भावाला मारहाण

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या गोडदेव नाका येथे पार्वती फर्निचर नावाने कन्हैयालाल व सुखदेव विश्वकर्मा ह्या दोन भावांचे संयुक्त मालकीचे दुकान आहे. या दुकानात कन्हैयालाल हे त्यांच्या सुतारकामाचे सनमाईक माळ्यावर ठेवत असताना सुखदेव याने ती माझी जागा असल्याचे सांगून विरोध केला. कन्हैयालाल याने आपण सामान इकडेच ठेवणार असे सांगितल्याने सुखदेवने शिवीगाळ करीत लाकडी दांड्याने त्याला मारहाण केली. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बांगलादेशी अटकेत

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या बंगा संघा झोपडपट्टीत राहणाऱ्या अफजल मंडल ह्या बांगलादेशी नागरिकास पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाचे उपनिरीक्षक तुषार माळोदे, शिपाई अमित तडवी यांनी बाळाराम पाटील मार्गावरील दोषी इंडस्ट्रियल इस्टेटमधून अटक केली. याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महिलेस फसवले



**मीरा रोड :** मीरा रोडच्या रामदेव पार्क भागात राहणाऱ्या आशा वर्देकर (४१) या शिवार उद्यान येथील एसबीआय बँकेत गेल्या होत्या. त्यांना एटीएम कार्ड पिन तयार करण्याची माहिती दिल्यावर त्या बाजूच्या एटीएममध्ये गेल्या; मात्र पिन तयार करणे जमत नसल्याने तेथील एका टोपी घातलेल्या अनोळखी व्यक्तीच्या मदतीच्या बहाण्याने वर्देकर यांना पिन तयार करण्याची प्रक्रिया करून दिली; परंतु हातचलाखी करत एटीएम कार्ड बदलले. नंतर त्याने एटीएममधून १५ हजार रुपये काढून घेतले. तसा संदेश आल्यावर वर्देकर यांच्या फिर्यादीनुसार नया नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जुगारप्रकरणी गुन्हा

**मीरा रोड :** मीरा रोड रेल्वेस्थानकाजवळील शांती शॉपिंग सेंटरमध्ये महालक्ष्मी व्हिडीओ गेममध्ये जुगार चालवला जात असल्याने गुन्हे शाखेच्या पोलिसांनी धाड टाकली. मालक दिनेश पुजारी, व्यवस्थापक सनोज दास, मशीन ऑपरेटर किशोरकुमार चंद्रवंशी हे व्हिडीओ गेमवर जुगार चालवत होते. जुगार खेळताना शकील शेख व भरत शहा हे पाच हजार ३२० रुपयांच्या मुद्देमालासह सापडले. याप्रकरणी नया नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक
# सिटी न्यूज
LIVE STREAM YouTube
सच का जोश
www.citynewsmumbai.com
मुंबई
●ठाणे, मुंबई ●मंगलवार ● दिनांक: 24 जनवरी 2023 ● वर्ष 12 ● अंक: 158 २ रुपये


## उद्धव ठाकरे ने साधा शिंदे गुट पर निशाना

**बालासाहेब ठाकरे के नाम के बिना चुनाव जीतना संभव नहीं**



मुंबई। हिंदुहृदय बालासाहेब ठाकरे के नाम के बिना चुनाव में जीत संभव नहीं है। शिंदे गुट के नेताओं को यह मालुम है इसलिए वे बालासाहेब ठाकरे की तस्वीर का इस्तेमाल कर रहे है. सोमवार को दिवंगत बालासाहेब ठाकरे की 97वीं जयंती पर माटुंगा स्थित षणमुखानंद सभागृह में आयोजित कार्यकर्ता सम्मेलन पूर्व सीएम उद्धव ठाकरे बोल रहे थे.बिना नाम लिए मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पर प्रहार करते हुए ठाकरे ने कहा कि शिंदे गुट को मैं चुनौती देता हूं.अगर हिम्मत है तो बालासाहेब के बजाय पीएम मोदी और भाजपा नेताओं के नाम और तस्वीर का इस्तेमाल करें। विपक्षी दल पर निशाना साधते हुए उद्धव ठाकरे शेष पृष्ठ 7 पर

## सत्ता के लिए बालासाहेब ठाकरे ने कभी नहीं किया समझौता - एकनाथ शिंदे

**उध्दव ठाकरे के वॉर पर सीएम शिंदे का पलटवार**



मुंबई। दिवंगत बालासाहेब ठाकरे की 97वीं जयंती पर सोमवार को विधान भवन के सेंट्रल हाल में उनकी तस्वीर का अनावरण किया गया. इस दौरान कार्यक्रम में उपस्थित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने कार्यक्रम को संबोधित किया उन्होंने बिना नाम लिए उद्धव ठाकरे पर जमकर निशाना साधा. बालासाहेब ठाकरे ने सत्ता के लिए कभी समझौता नहीं किया. उन्होंने मुख्यमंत्री पद के लिए अपने विचारों से कभी समझौता नहीं किया, हम उनके ही विचारों पर काम कर रहे है, शिंदे ने कहा कि बालासाहेब के विचारों को सुनने से आज भी ऊर्जा और प्रेरणा मिलती है। हम बालासाहेब द्वारा दी गई शिक्षा का पालन कर रहे है.वे हमेशा अपने शब्द पर अटल रहे. उन्होंने कभी अपने शब्द को नहीं बदला। बालासाहेब हमारे गुरु के साथ परिवार के मुखिया थे। शिंदे ने बालासाहेब ठाकरे के साथ - साथ आनंद दिघे को भी याद किया उन्होंने अपने भाषण में कहा कि आज आनंद दिघे साहेब शेष पृष्ठ 7 पर

## राज्यपाल कोश्यारी ने पीएम मोदी से पद मुक्त करने की मांग

**कोश्यारी से इस फैसले के बाद राज्य की सियासत गर्म,विपक्ष के नेता हुए हमलावर**



मुंबई। राज्यपाल भगत सिंह कोश्यारी ने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी से पद मुक्त करने की इच्छा प्रकट की है.राज्यपाल कोश्यारी के कार्यालय से जारी प्रेस नोट में यह जानकारी दी गई है.कोश्यारी ने कहा कि पीएम मोदी के मुंबई दौरे के दौरान उनसे हमारी मुलाकात हुई उस दौरान हमने उनसे राजनीतिक जवाबदारी से मुक्त करने की इच्छा व्यक्त की है.कोश्यारी ने कहा कि राजनीति से मुक्त होकर अपने जीवन में कुछ अध्ययन और चिंतन करना चाहता हूँ. राज्यपाल ने कहा कि महाराष्ट्र जैसे संतों, समाज सुधारकों और नायकों की एक महान भूमि का राज्यपाल बनना मेरा सौभाग्य था। राज्य की जनता ने तीन साल तक मुझे जो प्यार और स्नेह दिया है.उसे मैं कभी भूल नहीं सकता। उन्होंने कहा कि पीएम मोदी से हमने शेष पृष्ठ 7 पर

## मनपा की अब तक 54 प्रतिशत प्रॉपर्टी टैक्स वसूली





मुंबई: मनपा प्रशासन की कमाई का मुख्य स्रोत प्रॉपर्टी टैक्स में इस साल 54 प्रतिशत कमाई अभी तक हुई है। मार्च आखिरी तक मनपा को बकाया 46 प्रतिशत वसूली करनी होगी। मनपा प्रशासन कोरोना काल में भी प्रॉपर्टी शेष पृष्ठ 7 पर

## पुलिस का मनोबल बढ़ता है - मधुकर पांडे

**1 करोड़ 5 का मुद्देमाल पीढ़ीतो को किये वापस**





**चास्मे की फ्रेम से लेकर फोरचूनर कर ऑटो रिक्शा बाईक, स्कूटर सोने के गहने, मोबाइल एम बी वी वी पुलिस ने लोटाय**

मीरारोड ( सिटी न्यूज मुंबई शकील शेख ) मीरा भायंदर वसई विरार पुलिस आयुक्त मधुकर पांडे के हाथों कल कनकिया के शेहनाई हाल मे करीब एक करोड़ ५ लाख रु का चोरी हुआ सामान सनमानपूर्वक लोटाया है जोस से सभी परिवार मे ख़ुशी की लहर दौड़ पड़ी है सारे परिवार पुलिस इस कार्य की जमकर प्रसंशा की है।कल पुलिस आयुक्त द्वारा मीरा भयंदार के नयानगर, कनकिया नवघर, काशीमीरा, उत्तन भयंदार पुलिस स्टेशन की हद मे घर फोड़ी से ले कर महँगी कार, बाईक,स्कूटर ओर दुकान मे चोरी के मामले दर्ज हुए थे जिस मे सोने (गोल्ड ) के हार, चैन चूड़ी, रिंग, बिस्किट, नगद कैश, मोबाइल, स्कूटर, ऑटोरिक्शा शेष पृष्ठ 7 पर

CamScanner

# राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत मुलींच्या गटात मुंबई व कोल्हापूर अव्वल तर मुलांच्या गटात पुणे विभागाचा दबदबा

**पालघर, प्रतिनिधी**

पालघर येथे सुरू असलेले १९ वर्षाखालील वयोगटातील बॉक्सिंग स्पर्धेत मुलींच्या गटात मुंबई व कोल्हापूरने सर्वाधिक पदक घेतली तर मुलांच्या गटामध्ये पुणे विभागाने दबदबा निर्माण करत सहा सुवर्णपदकांवर नाव कोरले. या स्पर्धा तीन दिवसापासून पालघर जिल्हा क्रीडा संकुलाच्या मैदानावर संपन्न झाल्या.या अंतिम फेरीच्या बॉक्सिंग लढतीचा शुभारंभ यशवंतराव चाफेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीलिमा सिंग, महावितरणचे प्रभारी अधिकारी युवराज जरक, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, वामन वसलखांब, प्रकाश वाघ यांच्या हस्ते करण्यात



आलापालघर खेलो इंडिया बॉक्सिंग सेंटर मध्ये सलग तीन दिवस राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धा पार पडल्या यामध्ये राज्यातील आठ विभागातील २१६ बॉक्सर सहभागी झाले होते. मुलींच्या गटात मुंबई व कोल्हापूर विभागाने समसमान सुवर्णपदक पटकावून स्पर्धेत दबदबा निर्माण केला तर मुलांमध्ये अकरा विविध वजनी गटांमध्ये पुणे विभागाने सहा सुवर्णपदक पटकावून आपले वर्चस्व सिद्ध केलेराज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत मुंबई विभागातून सुवर्णपदक पटकावणारे बॉक्सर इशरत अन्सारी, मधुरा पाटील, जागृती बोथ, कोल्हापूर विभागातून सृष्टी रासकर, स्वप्ना चव्हाण, वृषाली कारंजे औरंगाबाद विभागातून साक्षी वाघिरे, खुशी जाधव पुणे विभागातून वैष्णवी वाघमारे काया चौधरी क्रीडा प्रबोधिनी गौरी मुरुमकर कांचन सुरांसे यांनी पटकावले.तर मुलांमध्ये पुणे विभागातून शोएब सय्यद अथर्व राजपूत वेदांत इंगळे पृथ्वीराज बागल पूजा अपराध कुणाल घोरपडे तर प्रबोधिनी क्रीडा प्रबोधिनी मधून देवा महागावकर नीरज ठाकूर हिमांशू चौधरी तर नागपूर विभागातून अघोष अभिषेक जांगडी तेजस पेंडम यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पालघर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय त्याचप्रमाणे यशवंतराव चाफेकर महाविद्यालय बॉक्सिंग असोसिएशन ऑफ पालघर जिल्हा यांनी मदत केली.चौकटपालघर जिल्ह्यामध्ये सहा महिन्या अगोदर खेलो इंडिया च्या माध्यमातून बॉक्सिंग सेंटर सुरु करण्यात आले सेंटरला सराव करणारी इशरत अन्सारी या बॉक्सरला ४५ किलो वजनी गटा मध्ये सुवर्णपदक प्राप्त झाले पालघर जिल्ह्याला राज्यस्तरावर बॉक्सिंग मध्ये पहिले सुवर्णपदक मिळवण्याच्या मान ईशरत अन्सरिने पटकावला आहे जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी तिचे कौतुक केले आहे.

# नालासोपारा पूर्व विजय नगर येथे माघी गणेशोत्सवाचे आयोजन



श्री गणेश / शिव मंदिर ( ट्रस्ट ) विजय नगर नालासोपारा पूर्व सालाबादप्रमाणे या वर्षीही श्री माघी गणेशोत्सव साजरा करत आहे गणेशोत्सवाच्या महोत्सवात भंडारा व धार्मिक सोहळ्याचा कार्यक्रम होणार आहे सर्व भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा . बुधवार दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ५ वाजता गायत्री परिवारा द्वारा शुद्धिकरण मंत्र उच्चारण करून जयंती महोत्सवाची सुरुवात होणार असून सकाळी ६ वाजता गणेश पूजन महाभिषेक आवर्तन हवन, महापूजा व श्रीं ची आरती होईल त्यानंतर सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत श्री नागेश्वर महिला भजन मंडळाचे गुजराथी भजन व ह.भ.प.सौ.संगिता धूरू यांचे श्री गणेश जन्माचे किर्तन होणार आहे दुपारी १२.३५.वाजता श्रीं ची जन्म महाआरती श्री चे दर्शन आणि प्रसाद वाटप करण्यात येणार आहे दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जय रिद्धी सिद्धी माता राजस्थानी महिला भजन मंडळाचे व शिव चर्चा उत्तर भारतीय महिला भजन मंडळाच्या भजनांचा कार्यक्रम होणार आहे सायंकाळी ६ ते ७.३० ह्या वेळेत सडयेवाडी विकास मंडळ व महाप्रासादिक भजन मंडळाचे भजन होणार असून ७.३०. वाजता श्री ची महाआरती करण्यात येणार आहे रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत ह.भ.प. तुकाराम बुवा गावडे यांचे हरि किर्तन तसेच राम जानकी भजन मंडळ विजय नगर अखंड जागर करणार आहेत रात्रौ ८ ते ११ ह्या वेळेत श्री च्या महाप्रसाद भंडारा चे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी भंडाऱ्याचा लाभ घ्यावा असे श्री गणेश शिव मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष श्री बंशनारायन मिश्र (टिकोरी) , सेक्रेटरी श्री रमेश.बा.लिंगायत,व खजिनदार श्री रविंद्र झेंडे यांनी आवाहन केले आहे

# प्रभाग समिती जी अंतर्गत वॉर्ड नं. ८९ व परिसरातील भीषण पाणीटंचाईबाबत आयुक्तांना निवेदन



**वसई, प्रतिनिधी**

वॉर्ड नं. ८९ मधील कामण, देवदल, कोल्ही, चिंचोटी या परिसरात महानगरपालिका पाणीपुरवठ्याची कोणतीही योजना नसल्याने दरवर्षी या भागातील जनतेला भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्या संदर्भात आपणास अनेकवेळा प्रत्यक्ष भेटून व पत्राद्वारे कळवले आहे. या ठिकाणी नळपाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण आहे. कामण येथे ग्रा.पं. काळीन योजना बंद आहे, दलित वस्ती पाणीपुरवठा योजना बंद आहे. त्यामुळे लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तसेच या भागातील आदिवासी बांधवांना नदीतील दुषित पाणी प्यावे लागत आहे.

तरी माझ्या निवेदनाचा विचार करून वसई पूर्व भागातील पाणी प्रश्न सोडवावा, नाहीतर या भागात पाण्यासाठी नागरिकांचा मोठा उद्रेक होईल, असे नगरसेविका सौ. प्रिती दिनेश म्हात्रे यांनी निवेदनात म्हटले आहे.

Printed, Published and Owned by **Mrs.VIDYA VIJAY KHETALE** "Printed at Jivdani Art Media, Near Parera House, Next to Natalia Bungalow, Navpada, Vasai (W), Tal- Vasai, Dist- Palghar, Maharashtra, Pin-401202"and Published from Room no - 106, B- Alpa CO-OP Hous.Soci, Ltd, Shastri Nagar, Vasai (W), Tal- Vasai, Dist- Palghar, Pin-401202. **Telphone No** - 0250- 2330038, Mob. No- "9370188465, E-mail-vikasvasa28@gmail.com, **Editor. Mrs. VIDYA VIJAY KHETALE,**

RNI NO - MAHMAR/2012/44727

CS CamScanner

# पोलीस आयुक्तालयातील पाच अधिकाऱ्यांचा गौरव

## दहा कोटींचे रक्तचंदन जप्त, २८ वर्षांनी हत्येचा छडा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : क्लिष्ट हत्या, जबरी चोरी आदी विविध गुन्ह्यांची उकल करून कुख्यात टोळ्या जेरबंद करणाऱ्या पाच पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते डिसेंबर महिन्यातील 'उत्कृष्ट उकल'चा (बेस्ट डिटेक्शन) पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यात काशिमीरा, वालीव ठाणे तसेच गुन्हे शाखा १, २ आणि ३ च्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

दर महिन्याला उत्कृष्ट तपास करून गुन्ह्यांची उकल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना पोलीस आयुक्तांच्या हस्ते 'उत्कृष्ट उकल'चा पुरस्कार देण्यात येतो. नायगावमधील स्टार सिटी येथे २० डिसेंबरला सुनील तिवारी या मूकबधिर व्यक्तीची हत्या झाली होती. गुन्हे शाखा २ आणि मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने तांत्रिक विश्लेषण करून पुरावा नसताना आरोपी यशवर्धन झा याला अटक केली. चोरीच्या उद्देशाने ही हत्या झाली होती. याप्रकरणी गुन्हे शाखा २ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूजी रणावरे तसेच मध्यवर्ती गुन्हे शाखेचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख यांना उत्कृष्ट तपासासाठी गौरविण्यात आले.

त्याचबरोबर १९९४ मध्ये पेणकरपाडा येथील राजनारायण प्रजापती यांच्या पत्नी आणि तीन मुलांची हत्या करण्यात आली होती. गुन्हे शाखा १ च्या पथकाने २८ वर्षांपूर्वी झालेल्या हत्येचा छडा लावला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी काल्या ऊर्फ राजकुमार हा परदेशात पळून गेला होता. त्याचा माग काढून मुंबई विमानतळावरून त्याला अटक करण्यात आली. याप्रकरणी गुन्हे शाखा १ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरवण्यात आले.

वालीव पोलिसांनी महामार्गावरून रक्तचंदनाची चोरटी तस्करी उघडकीस आणली. पोलिसांनी कारवाई करून एक ट्रक अडवला आणि नऊ कोटी ६१ लाख रुपयांचे रक्तचंदन जप्त केले. आजवरची ही सर्वात मोठी कारवाई होती. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे यांना गुन्ह्याची 'उत्कृष्ट उकल' केल्याप्रकरणी गौरविण्यात आले.

### मोबाइल चोरणारी टोळी जेरबंद

■ काशिमीरा पोलिसांनी मोबाइल चोरी करणाऱ्या एका टोळीला अटक करण्यात यश मिळवले होते. ही टोळी विविध प्रकारे नागरिकांचे मोबाइल लंपास करत होती. या गुन्ह्यांचा छडा लावून आरोपींकडून १७ गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली. काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांना या कार्याबद्दल गौरविण्यात आले.

■ शहरात गाड्यांच्या काचा तोडून महागड्या 'म्युझिक सिस्टीम' चोरणारी टोळी सक्रिय झाली होती. गुन्हे शाखा ३ च्या पथकाने या टोळीचा छडा लावला आणि तिघांना अटक केली. या टोळीकडून चोरलेले २० कार टेप आणि एकूण १० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्हे शाखा ३ चे प्रमुख प्रमोद बडाख यांना याप्रकरणी उत्कृष्ट उकल केल्याबद्दल गौरविण्यात आले.

लोकसत्ता Tue, 24 January 2023
https://epaper.loksatta.com/c/71496721

CamScanner